# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०८/२०२४ (शुक्रवार) सकाळ**

---

**घरासमोर हॅन्डल लॉक करूण ठेवलेली मोटरसायकल चोरी करणारे आरोपीला बुट्टीबोरी पोलीसांनी मोटरसायकलसह केले अखेर जेरबंद**

फिर्यादी नामे— शुभम नानाजी वाघमारे वय २४ वर्ष रा. वार्ड क्र. ०३ रूईखैरी एकता नगर ता. जि. नागपूर यांनी पोस्टे बुट्टीबोरीला तोंडी रिपोर्ट दिली कि, दि. २५/०७/२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी हा कामावरून घरी परत आला व मो. सा. क्र. एम. एच.—४०/सी.एन.—६०३५ ही घरासमोर हॅन्डल लॉक करूण ठेवली होती व रात्री जेवण करूण घरीच झोपलो दि. २६/०७/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वा. दरम्याण झोपून उठून घरा बाहेर आला असता त्याला त्यांच्या घरा समोर ठेवलेली मो. सा. क्र. एम.एच.—४०/सी.एन—६०३५ ही दिसून आली नाही ज्यामुळे फिर्यादी यांनी घरी विचारपूस केली परंतू घरी कोणालाही काही माहित नसल्याचे सांगितले फिर्यादी यांनी मो.सा. हि गावाच्या आजूबाजूला दि. २७/०७/२०२४ पर्यंत शोध घेतला पण मिळून आली नाही. मो.सा. क्र. एम. एच.—४०/सी.एन—६०३५ ही हॅन्डल लॉक करूण ठेवली घरा समोरची मोसा कोणीतरी अज्ञात इसमाने चोरूण नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे बुट्टीबोरी येथे अप. क्र. ५३२/२०२४ कलम ३०३(२) बी. एन. एस चा गुन्हा नोंद असुन तपासावर आहे.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये अनोळखी आरोपीचा शोध घेणे कामी घटणास्थळ परीसरातील असलेल्या सि.सि.टि.व्हि कॅमेराची पाहणी करून व गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेता वरीष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे गुन्हयाचे तपासकामी विशेष पथक गठीत करून अनोळखी आरोपीचा शोध घेणे सुरू केले, गठीत पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गोपनिय मुखबिर पेरून तसेच तांत्रीक बाबीचे सहायाने गुन्हयातील अनोळखी आरोपीचा शोध घेत असता पोलीसांना माहिती मिळाली की एक इसम हा उमरेड परीसरात बालाजी नगर येथे राहत असून तो मो.सा. क्र. एम.एच.—४०/सी. एन—६०३५ हि वापरत असल्याची गोपनिय माहिती मिळाल्याने सदर घटणास्थळी पोहवा. प्रविण देव्हारे, पोशि. गौरव मोकळे हे रवाना होउण त्यांनी सापळा रचून सदर इसमास ताब्यात घेवून सदर इसमास त्यांचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव करण सुरेश मडावी वय २५ वर्ष रा. रूईखैरी ता.जि. नागपूर ह. मू. बालाजी नगर गिरडे यांच्या घरी किरायाणे उमरेड जि. नागपूर असे सांगितल्याने त्यास सदर मो.सा. बाबत विचारणा केली असता मोटरसायकल क्र. एम. एच.—४०/सी.एन—६०३५ ही रूईखैरी येथून घरासमोर हॅन्डल लॉक करूण ठेवलेली मो.सा.चे हॅन्डल लॉक तोडून चोरी केल्याची कबुली दिल्याने आरोपी कडून चोरीची मो.सा.एम.एच.—४०/सी.एन—६०३५ किंमती ४०,०००/—रू. रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड व पोलीस निरीक्षक श्री. हृदयनारायण यादव यांचे मार्गदर्शनाखाली गठीत विशेष पथकातील अधिकारी सपोनी प्रशांत लभाणे, पोहवा प्रविण देव्हारे, व पोशि गौरव मोकळे यांनी कामगिरी पार पाडली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रविण देव्हारे हे करीत आहे



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर